'द न्यूज बिज टाईम्स'

दि. २८/८/२०२५ पिंपरी, महाराष्ट्र. thenewzbiz@gmail.com वर्ष - दुसरे डिजीटल आवृत्ती

# 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' अंतर्गत विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे

पिंपरी, प्रतिनिधी : डॉ. डी. वाय. पाटील एसीएस कॉलेज, पिंपरीच्या क्विक हील फाउंडेशन सायबर वॉरियर्स क्लब तर्फे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पाअंतर्गत श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल, पिंपळे गुरव येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर जागरुकता सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाची माय डाटा, माय रिस्पॉन्सिबीलिटी ही संकल्पना होती.

या सत्रादरम्यान प्रणाली माने आणि नेहा माडिवाळकर यांनी विद्यार्थ्यांना ओटीपी स्कॅम, ऑनलाईन गेमिंग फ्रॉड आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना सायबर फसवणुकीपासून सावध राहण्यासाठी आवश्यक सुरक्षा उपाय समजावून सांगण्यात आले. तसेच सायबर गुन्ह्यांची तक्रार करण्यासाठी सायबर हेल्पलाइन क्रमांक १९३० आणि www.cybercrime.gov.in या संकेतस्थळाची माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी सायबर वॉरियर्स यांनी हॅकर मास्कचा वापर करून विविध खेळ आणि मनोरंजक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांमधील खरे-खोटे धोके ओळखण्याचे प्रशिक्षण दिले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

हा उपक्रम डॉ. डी. वाय. पाटील एसीएस कॉलेज, पिंपरीचे प्राचार्य डॉ. रंजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. तसेच शिक्षक समन्वयक सत्यवान कुंजीर यांनी विद्यार्थ्यांसाठी या उपक्रमाच्या आयोजनात मोलाचे सहकार्य केले.

क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करून माय डाटा, माय रिस्पॉन्सिबीलिटी हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा सायबर वॉरियर्स क्लबचा उद्देश आहे.



